# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १५९–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. बाबू तुका माने,<br>मु. पो. शेगांव, ता. जत, जि. सांगली<br><br>**विरूध्द** | अर्जदार |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**<u>कोरम</u>** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार.

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. बाबू तुका माने, मु. पो. शेगांव ता. जत, जि. सांगली यांनी परिशिष्ट अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ मधील नियम ६.१० नुसार वितरण कंपनी विरुध्द मंचाकडे तक्रार दि. १६.७.२०१० रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

तक्रारदार यांनी गट क्र. १०९५ मध्ये शेतीपंपास नवीन विद्युत पुरवठा मिळणेसाठी वितरण कंपनीच्या कवठे महांकाळ विभागांतर्गत जत उप विभागाकडे दि. १०.४.२०१० रोजी अर्ज दिला.

वितरण मेन्सचा विस्तार असलेने त्यांना १ महिन्यात चलन मिळणे आवश्यक होते ते त्यांना १०.७.२०१० ला देण्यात आले आहे. त्यामुळे कृ ती मानके विनियमातील तरतुदीचे पालन करण्यात अपयश आल्याने ग्राहकाने २ महिन्याची भरपाईची मागणी मंचाकडे दाखल तक्रारीत केली आहे. त्यापूर्वी तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र. २६ दि. १२.४.२०१० रोजी रितसर तक्रार दाखल केली आहे. अंतर्गत कक्षाने आदेश क्र. ४७०८ दि. १३.४.२०१० नुसार आदेश पारीत झाला. तक्रारीमध्ये विलंबापोटी भरपाई मिळावी अशी मंचाकडे मागणी केली आहे. सदरची तक्रार मंचाकडे प्रतिधीमार्फत दाखल केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ७.८.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी वीज पुरवठा मिळावा म्हणून दि. १२.४.२०१० रोजी अर्ज प्राप्त झाला आहे. त्यांना दि. ६.७.२०१० रोजी चलन देण्यात आलेले आहे. तसेच वरील तक्रारीमध्ये दोन नांवे असल्याने नेमकी कोणाची तक्रार आहे हे कळत नसल्याने अर्ज निकाली काढावा, कसलीही कार्यवाही करण्यात येवू नये.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. १७.८.२०१० रोजी सुनावणी घेतली असतां, तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे हजर. वि.प.तर्फे श्री. राठोड, सहाय्यक अभियंता, जत उप विभाग व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता हजर. तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे यांनी मंचासमोर दि. ६.७.२०१० ला चलन दिल्याचे मान्य केले, तरी चलन मिळण्यास ८ आठवड्यांचा विलंब झाला आहे, त्यामुळे रु. ८००/– भरपाई मिळावी अशी मागणी केली. वि.प.तर्फे विलंबाबाबत कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही.

१) तक्रारदार यांना विलंबापोटी वि.प.ने ग्राहक भरपाई देणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

कारणमिमांसा

तक्रारदार यांनी वि.प.कडे दि. १०.४.२०१० ला अर्ज दिल्याचे म्हटले आहे. या उलट, अर्ज दि. १२.४.२०१० ला प्राप्त झाल्याचे वि.प.ने म्हटले आहे. वितरण मेन्सच्या विस्तार असलेने १ महिना मुदतीत चलन देणे आवश्यक होते व ते दि. ६.७.२०१० ला देण्यात आले या बाबत वि.प.चे दुमत नाही. कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार १ महिन्यात म्हणजे दि. ९.५.२०१० पर्यत चलन देणे आवश्यक होते, ते दि.६.७.२०१० ला देण्यात आले. वि.प.ने लेखी अहवालात दोन नांवे असल्याने नेमकी कोणाची तक्रार आहे हे कळत नसल्याने अर्ज निकाली काढावा असे म्हटले आहे, परंतु वि.प.ने अर्जात दोन नांवे आहेत असे म्हटले असले तरी मंचाकडील तक्रारीत दोन नांवे नाहीत. वि.प.कडील अर्जात दोन नांवे असल्यामुळे वि.प.चा संभ्रम झाला असावा. असे असले तरी, केवळ २ नांवे आहेत या कारणास्तव अर्ज निकाली काढणे संयुक्तिक होणार नाही. अर्ज प्राप्त झाल्याचे वि.प.ने तक्रारदाराकडून खात्री करुन घेणे जरुरी होते, केवळ भरपाईची रक्कम टाळण्यासाठी वि.प.ने आपल्या दि. ७.८.२०१० च्या लेखी अहवालात तसे नमूद केले आहे. यामुळे वि.प.ने कृती मानकाचा भंग केला आहे, त्याचा या निर्णयास बाधा येत नाही, ग्राहकाचा भरपाईचा हक्क नाकारता येणार नाही. त्यामुळे दि. ९.५.२०१० ते ६.७.२०१० या कालावधीतील ८ आठवड्यांच्या विलंबासाठी प्रति आठवडा रु.१००/– या प्रमाणे रु. ८००/– भरपाई वि.प.ने तक्रारदार यांस देणे जरुरी आहे. मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीने तक्रारदार यांस कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार दि. ९.५.२०१० ते ६.७.२०१० या ८ आठवड्यांच्या कालावधीतील विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु.८००/– भरपाई ग्राहकास द्यावी.

३) सदरची रक्कम दोन बिलींग सायकलमध्ये समायोजित करण्यात यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा(पूर्व),मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष